# 'द न्यूज बिज टाईम्स'

thenewzbiz@com ३/०८/२०२५, पिंपरी, महाराष्ट्र, संपर्क : ९७६६९५२११४ thenewzbiz@gmail.com वर्ष – दुसरे डिजीटल आवृती


## सायबर सुरक्षेसाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी उपक्रम



**पुणे, प्रतिनिधी :** स्वत शिक्षण संस्था गर्ल्स इंग्लिश मिडीयम स्कूल हडपसर पुणे येथे नुकताच एक उल्लेखनीय आणि प्रेरणादायी सायबर सुरक्षाविषयक उपक्रम पार पडला. अण्णासाहेब मगर महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स टीमने टीळलड क्वारत्र फौंडेशन अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेवर सखोल माहिती दिली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढवणे आणि त्यांना सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सक्षम बनवणे हा होता. सायबर वॉरियर्सच्या टीमने अत्यंत प्रभावी आणि संवादात्मक पद्धतीने माहिती सादर केली. त्यांनी सोशल मीडिया वापरताना होणाऱ्या फसवणुकीचे प्रकार, पासवर्ड सुरक्षितता, बँक फसवणूक, फिशिंग, ओळख चोरी यांसारख्या विषयांवर सोप्या उदाहरणांसह माहिती दिली. ही माहिती विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अनुभवाशी जोडून समजेल अशा भाषेत मांडण्यात आली.

विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी सायबर सुरक्षेविषयी प्रश्न विचारले, आपली मते व्यक्त केली, तर काहींनी आपले अनुभव देखील शेअर केले. या संवादातून विद्यार्थ्यांमध्ये सजगतेचा आणि आत्मभानाचा विकास झाल्याचे दिसून आले. कार्यक्रमाच्या अखेरीस सर्वांनी एकत्र येऊन सायबर सुरक्षेची शपथ घेतली आणि डिजिटल जगात जबाबदारीने वागण्याचा संकल्प केला.या उपक्रमाच्या यशामध्ये अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, तसेच डॉ. शुभांगी औटी, डॉ. विलास वाणी, प्रा. अनिल जगताप आणि प्रा. मनिषा गाढेकर यांचे मोलाचे योगदान लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सायबर वॉरियर्स तेजस दळवी आणि आश्लेषा दामगुडे या टीमने अत्यंत प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक झिनत सय्यद व सर्व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे तर सामाजिक भानदेखील विकसित होते. अशा कार्यक्रमांची पुनरावृत्ती व्हावी अशी आमची इच्छा आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना डिजिटल युगात सुरक्षिततेचे भान देणारा ठरला असून, शाळा स्तरावर सायबर शिक्षणाची पायाभरणी करत विद्यार्थ्यांना जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याची दिशा दाखवणारा ठरला.